▶ वर्ष–३

■ अंक–५

# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!


आरोग्य विभागाला ठाणे महापालिका आयुक्तांचे निर्देश...

(पान ६ वर)




■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ४ सप्टेंबर २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


## ठाण्यात यंदा गोकुळ हंडीची धूम!


जल्लोष... थरार आणि संस्कृतीची नांदी!



गोकुळ हंडी




एकूण 51 लाखांची बक्षिसे
प्रत्येक सलामीला बक्षीस
खुल्या गटासाठी आकर्षक बक्षीस
ठाण्यातील गोविंदासाठी स्वतंत्र बक्षीस
महिलांसाठी स्वतंत्र बक्षीस
वैद्यकीय आरोग्य सुविधा
सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था

केसरमिल नाका,गोकुळनगर,ठाणे

आयोजक:- कृष्णा पाटील



शारदा संकल्प प्रतिष्ठान

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ४ सप्टेंबर २०२३
पान : २
www.diwanews.com

## मराठा आंदोलकांवरील लाठीमारप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई – उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई :** 'मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्याच्या अंबड तालुक्यातील अंतरवली येथे आंदोलन करणाऱ्या समाजबांधवांवर पोलिसांकडून झालेला लाठीमार, बळाच्या गैरवापरासंबंधी उच्चस्तरीय चौकशीचे आणि दोषी पोलिसांवर कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. या घटनेबाबत मराठा बांधवांसह सर्व महाराष्ट्रवासियांच्या भावना तीव्र आहेत. राज्य शासन देखील या भावनांशी सहमत असून शासनाने याप्रकरणी गंभीर दखल घेतली आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे.




दिवा शहरातील समाजसेवक अशोक सोलंकी यांना दरवर्षी दिव्यातील अनेक गुजराती महिलां राखी बांधत असतात. प्रत्येक वर्षी दिव्यातील गुजराती महिला सोलंकी यांच्या ऑफिस किंवा घरी जाऊन रक्षाबंधन उत्सव साजरा करतात. श्री. अशोक सोलंकी हे नियमित गुजराती समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतात. रक्षाबंधन दिवशी महिला, सोलंकी यांना राखी बांधतानाचे काही क्षण!






## आर्थिक व्यवहारातून तरुणाची कोयत्याने हत्या

**ठाणे:** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या वसंत विहार भागातील उपशाखा प्रमुख अक्षय ठुबे (२५) यांची हत्या करून पुरावा नष्ट करण्याचा उद्देशाने त्यांच्या मृतदेहावर पेट्रोल टाकून जाळणाऱ्या ठाण्यातील गुरूनाथ काकडया जाधव (२७) करण अनिल सावरा (२४) आणि प्रशांत ऊर्फ बाबु मारूती जाबर (२१) या तिघांना अवघ्या काही तासात ठाणे पोलिसांनी जेरबंद केले. ही हत्या आर्थिक व्यवहारातून झाली असून हत्येसाठी कोयत्याचा वापर केल्याची पोलिसांनी दिली. वसंत विहार येथील धर्मवीर नगर परिसरात राहणारे अक्षय ठुबे हे शिंदे गटाचे तेथील उपशाखा प्रमुख आहेत. मंगळवारपासून ते घरी परतले नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी बुधवारी चितळसर पोलीस ठाण्यात ते बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. अक्षय यांचे अटकेतील त्रिकुटांसोबत पैशाचे देवाण-घेवाणीवरून भांडण झाले होते. त्याचा राग धरून त्या तिघांनी रात्रीच्या सुमारास गुरुनाथ जाधव याच्या घरी मयत अक्षय ठुबे यांना बोलवून त्यांची हत्या केली.

# शैलेश पाटील यांच्या वतीने महारक्षाबंधन उत्सवाचे आयोजन

## शेकडो महिलांनी पाटील यांना बांधली राखी

**दिवा:-** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही माजी नगरसेवक शैलेश पाटील यांच्या कार्यालयात महारक्षाबंधन उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

दरवर्षी दिवा शहरातील शेकडो महिला माजी नगरसेवक शैलेश पाटील यांना राखी बांधत असतात. यासाठी शैलेश पाटील यांच्या कार्यालयात महा रक्षाबंधन उत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षीही या उत्सवाचे आयोजन शैलेश पाटील यांच्या दिवा स्टेशन येथील कार्यालयात करण्यात आले. यावेळी शेकडो महिलांनी शैलेश पाटील यांना राखी बांधली.पाटील यांनीही त्यांच्या शेकडो बहिणींचे उत्साहात स्वागत केले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ४ सप्टेंबर २०२३
पान : ३
www.diwanews.com

## राज्यातील १०८ शिक्षकांना क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार जाहीर

**मुंबई –** सन २०२२-२३ च्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी शासनाने शालेय शिक्षण स्तरावर प्रवर्गनिहाय १०८ शिक्षकांची निवड केली आहे. या शिक्षकांना ५ सप्टेंबर रोजी शिक्षकदिनी मुंबईत होणाऱ्या कार्यक्रमात गौरविण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झालेल्या शिक्षकांचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी अभिनंदन केले. सन २०२१-२२ पासून या पुरस्काराचे निकष सुधारीत करून हा पुरस्कार क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार नावाने देण्यात येत आहे.

## अर्चना निलेश पाटील यांच्या वतीने राज्यस्तरीय मंगळागौर स्पर्धेचे आयोजन

**दिवा:–** शिवसेना शहर महिला आघाडीच्या माध्यमातून अर्चना निलेश पाटील यांनी राज्यस्तरीय मंगळागौर स्पर्धेचे आयोजन दिवा शहरात केले आहे. शनिवार, ९ सप्टेंबर रोजी सदर स्पर्धा आयोजित केली जाणारअसून,ही स्पर्धा आकांक्षा हॉल बी आर नगर दिवा पूर्व येथे संपन्न होणार असल्याची माहिती अर्चना निलेश पाटील यांनी दिली आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला २१ हजार रुपये रोख, द्वितीय पारितोषिक ११००० व तृतीय पारितोषिक ७००० अशी बक्षीस दिली जाणार आहेत.उत्कृष्ट उखाणा पाच प्रेक्षक महिलांसाठी सुंदर पैठणी दिली जाणार असल्याची माहिती आयोजक अर्चना पाटील यांनी दिली आहे.कार्यक्रमाचे संयोजन किरण शितकर करणार आहेत.



## दिव्यातील समस्या प्रकरणी ठाकरेंच्या शिवसेनेने घेतली पालिका आयुक्तांची भेट

**ठाणे :** दिव्यातील समस्यांवरून शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) आक्रमक झाली आहे. दिवा शहरातील पाणीप्रश्न, सांडपाणी व्यवस्था, रस्ते, गतिरोधक, पथदिवे, घनकचरा व्यवस्थापन अशा विषयांबाबत येथील ठाकरे गटाच्या शिष्टमंडळाने पालिका आयुक्त अभिजित बांगर यांची भेट घेत त्यांना निवेदन दिले. याप्रश्नी पालिका प्रशासनाने तात्काळ पावले उचलावीत अशी मागणी आयुक्तांकडे यावेळी करण्यात आली.



दिव्यात तीव्र पाणी टंचाई जाणवत असून प्रभाग क्र. २७ मध्ये कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच संपूर्ण दिव्यात मुबलक पाणीपुरवठा होण्यासाठी तातडीने कारवाई करावी. दिवा पश्चिमेला रेल्वे रूळा खालून पूर्व – पश्चिमेला जोडणारी पुश थ्रू पध्दतीने टाकण्यात येणाऱ्या लाइन ला रेल्वेने मंजुरी दिली आहे तरी महानगरपालिकेकडून लवकरात लवकर कार्यवाही करून ती पूर्णत्वास आणून तेथील लोकांची पाणी टंचाई पासून मुक्तता करावी. काही भागातील नाले बंदिस्त करून सांडपाण्याचे व्यवस्थापन तातडीने करण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपशहर प्रमुख सचिन पाटील ह्यांच्या नेतृत्वखाली पालिका आयुक्त अभिजित बांगर यांची भेट घेतली. यावेळी माजी नगरसेविका अंकिता पाटील युवासेना शहर अधिकारी अभिषेक ठाकूर, उपशहर संघटक प्रियांका सावंत, वैष्णव पाटील उपस्थित होते. यासोबत गणेशोत्सवापूर्वी दिव्यातील खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती करावी, दिवा स्टेशन ते आगासन रोड तसेच दिवा स्टेशन ते साबे रोड आणि मुंब्रादेवी कॉलनी रस्ता कॉंक्रीटीकरण केल्यामुळे रस्त्यावर मोक्याच्या ठिकाणी गतिरोधक बसवण्यात यावेत, तसेच दिवा चौकात उभारण्यात आलेल्या चौकाच्या शिल्पावरून स्थानिक भूमिपुत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात असलेला असंतोष त्यामुळे आगरी-कोळी शिल्प उभारावे, पथदिवे बसवावे ही मागणी निवेदनात करण्यात आली. दिव्यात कचऱ्याचे व्यवस्थापन घंटागाडीद्वारे करण्यात येते. मात्र उघड्यावर टाकला जाणारा कचरा नियमित उचलला जात नसल्याने शहरात आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. त्याकरिता दिवा शहरातील कचऱ्याचे संकलन घरोघरी जावून नियमितपणे करण्यासाठी संबधितांना आदेश देण्याची विनंती या शिष्टमंडळाने आयुक्त बांगर यांना केली.

## दिवा पश्चिमेच्या स्वयंचलित सरकत्या जिन्याचं लोकार्पण

**दिवा:–** दिवा पश्चिमेला रेल्वेमार्फत बांधण्यात आलेल्या सरकत्या जिन्याचे लोकार्पण माजी नगरसेवक शैलेश पाटील व अमर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले .

खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या सततच्या पाठपुरव्याने दिवा रेल्वे स्थानकात सरकता जिना बसविण्यात आला आहे. दिवा पश्चिम येथील सरकत्या जिन्यांचे लोकार्पण कमलाकर भगत यांच्या हस्ते श्रीफळ वाढवुन व ह.भ.प श्री अरविंद भोईर यांच्या हस्ते फित कापुन करण्यात आले. याप्रसंगी मा.नगरसेवक शैलेश पाटील ,मा.नगरसेवक अमर पाटील , मा.नगरसेविका दिपाली उमेश भगत ,विभागप्रमुख भालचंद्र भगत, ॲड सुप्रिया आदेश भगत, दिवा ग्रामस्थ व शिवसैनिक पदाधीकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.









दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ४ सप्टेंबर २०२३


www.diwanews.com



### 'महेंद्रगिरी' या युद्धनौकेचे डॉ. सुदेश धनखड यांच्या हस्ते जलावतरण

**मुंबई :** माझगाव डॉक शिप बिल्डर्समध्ये (एमडीएल) बांधणी करण्यात आलेल्या 'महेंद्रगिरी' या युद्धनौकेचे जलावतरण उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड यांच्या हस्ते करण्यात आले. 'महेंद्रगिरी' ही भारतीय नौदलाच्या प्रोजेक्ट १७-ए अंतर्गत सातवी आणि एमडीएलकडून बांधण्यात आलेली चौथी स्टेल्थ विनाशिका आहे. डॉ.सुदेश धनखड यांनी या युद्धनौकेचे नामकरण केले होते.

# ठाणे जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांवर तातडीने गुन्हे दाखल करा

## – मुख्य कार्यकारी अधिकारी

**ठाणे :** जिल्ह्यातील प्रत्येक तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी आपल्या तालुक्यातील बोगस डॉक्टर व अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुद्ध तातडीने तपासणी करून गुन्हे दाखल करावे, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हास्तरीय बोगस शोध व पुनर्विलोकन समितीचे सहअध्यक्ष मनुज जिंदल यांनी गुरुवारी दिले.

जिल्हास्तरीय बोगस शोध व पुनर्विलोकन समितीची सभा आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिंदल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परग, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भारत मासाळ यांच्यासह तालुका आरोग्य अधिकारी, पोलीस व नगरपरिषदांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्यात बोगस डॉक्टरांची प्रॅक्टिस बंद व्हावी यासाठी कठोर कारवाई करावी. तालुक्यांमधील वैद्यकीय प्रॅक्टिस करणाऱ्या सर्वांची यादी तयार करून त्यांची तपासणी करावी. होमिओपॅथी अथवा नॅचरोपॅथी पदवी असलेल्या वैद्यकीय व्यवसायिकांना ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करता येत नाही, अशा प्रॅक्टिस करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करावेत. डॉक्टरांना दिलेल्या परवान्याप्रमाणेच ते प्रॅक्टिस करतात का, बोगस प्रॅक्टिस होते का? याची कसून तपासणी करून आवश्यक तेथे धाड टाकावी व अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध पोलीसात गुन्हे दाखल करावे, असे निर्देश जिंदल यांनी यावेळी दिले.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. परगे यांनीही तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना यासंदर्भात सतर्क राहून कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.



### मनोरुग्णांना राखी बांधून विद्यार्थ्यांनी साजरी केली रक्षाबंधन

ठाणे: शारदा एज्युकेशन सोसायटी आणि आनंद विश्व गुरुकुल आणि कनिष्ठ महाविद्यालय यांच्या रॉट्रॅक्ट क्लब व एनसीसी कॅडेट्स यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांनी ठाण्यातील मेंटल हॉस्पिटल मधील रुग्णांसोबत रक्षाबंधन साजरा केला. यावेळी रोट्रॅक्ट क्लबचे विद्यार्थी आणि एनसीसीच्या मुली यांनी या रुग्णांच्या हातावर राखी बांधून व औक्षण करून समाजातील बांधिलकी व्यक्त केली. या प्रसंगी रुग्णांनी आपले विविध अनुभव व्यक्त करत हा मंगल सोहळा संपन्न केला.

## समायोजनात शिक्षकांची शहरालगत सोय

# आदिवासी भागातील शिक्षण मात्र राम भरोसे

*__ठाणे:__ ठाणे जिल्हा परिषदेने अतिरिक्त ठरलेल्या समाजशास्त्र पदवीधर शिक्षकांना पदावनत करून त्यांचे प्राथमिक शिक्षक म्हणून समायोजन प्रक्रिया राबविली आहे. ही प्रक्रिया राबवताना शासन निर्णयास हरताळ फासल्याने प्रक्रियेतील अनेक शिक्षकांची शहरालगतच्या शाळेत सोय झाली असली तरी ग्रामीण भागातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनेक शाळांमध्ये शून्य शिक्षक असे विदारक चित्र निर्माण झाल्याने या शाळां मधील विद्यार्थ्यांचे शिक्षण जिल्हा परिषदेने राम भरोसे सोडल्याचे दिसते.*

*ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शुक्रवारी २५ ऑगस्ट रोजी समाजशास्त्र विषयांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या १५२ शिक्षकांना प्राथमिक शिक्षक या पदावर समायोजन केले. ही प्रक्रिया राबवताना शासन निर्णयानुसार पेसा क्षेत्रातील जागा प्राधान्याने भरणे अपेक्षित होते. मात्र भिवंडी तालुक्यातील शहरालगत च्या शाळांमध्ये शिक्षकांचे समायोजन करण्यात आले. असं करताना कंपल्सरी वेकेन्सी ची पदे खुली करण्यात आली. वस्तुतः कंपल्सरी वेकेन्सी ची पदे नवीन भरती किंवा जिल्हा बदली ने आलेल्या शिक्षकांसाठी खुली करता येतात.*

*समायोजन प्रक्रिया राबवल्यानंतर संपूर्ण पेसा क्षेत्र असलेल्या शहापूर तालुक्यात जवळपास ९० पदे रिक्त राहिली असून रांजणकांबे, बिलोशी, चोंढा खुर्द, आणि मी दिवाळी यासारख्या जिल्हा परिषद शाळा शून्य शिक्षकी राहिल्या आहेत. तर डोळखांब भागातील पहिली ते आठवीपर्यंतच्या अनेक शाळांमध्ये एक किंवा दोन शिक्षक अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.*

*नियमबाह्य राबवलेल्या समायोजन प्रक्रियेमुळे संपूर्ण पेसा शहापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याने ही प्रक्रियाच रद्द करून नव्याने राबविण्याची मागणी शहापूर मतदारसंघाचे आमदार तथा अनुसूचित जमाती कल्याण समिती प्रमुख दौलत दरोडा यांनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केले आहे.*

# यंदा ठाण्यात गोकुळ दहीहंडीचा थरार

## गोकुळनगर येथे कृष्णा पाटील यांचे आयोजन

**ठाणे:-** गोकुळ नगर येथील भागात यंदा गोकुळ दहीहंडीचा थरार ठाणेकरांना पाहायला मिळणार आहे. एकूण ५१ लाखांची बक्षीसे असणारी प्रतिष्ठेची दहीहंडी यंदा गोविंदासह हजारो नागरिक अनुभवणार आहेत.

या दहीहंडीचे आयोजन भाजपचे माजी नगरसेवक कृष्णा पाटील यांनी केले आहे.

ठाण्यातील गोकुळ नगर परिसरात यंदा मोठ्या प्रमाणात दहीहंडी उत्सव सुरू होणार असून या उत्सवात गोकुळ दहीहंडीच्या माध्यमातून अधिकची भर पडणार आहे. भाजपचे माजी नगरसेवक कृष्णा पाटील यांच्या शारदा संकल्प प्रतिष्ठानच्या माध्यमातून ही गोकुळ हंडी उभारली जाणार आहे. एकूण ५१ लाखांची बक्षीस असणाऱ्या या दहीहंडीत ठाण्यातील स्थानिक गोविंदा पथकांसाठी स्वतंत्र पारितोषिक आहेत.तर मुंबईसह मुख्य खुल्या गटातील गोविंदा पथक यांच्यासाठी स्वतंत्र बक्षिसे असणार आहेत.सलामी देणाऱ्या प्रत्येक गोविंदा पथकास बक्षिसे देण्यात येणार आहेत. याशिवाय महिलांसाठी स्वतंत्र बक्षीस दिली जाणार आहेत. गोविंदांच्या सुरक्षेसाठी आयोजकांमार्फत विशेष काळजी घेण्यात आली असून वैद्यकीय उपचार देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या दहीहंडी उत्सवाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यासह अनेक मान्यवर नेते उपस्थित राहणार आहेत.गोकुळ दहीहंडी उत्सवाला गोकुळ डेअरीचे चेअरमन व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे

या दहीहंडी उत्सवा दरम्यान सर्व गोविंदा पथकांसाठी दिवसभर मोफत अन्नदान उपक्रम कृष्णा पाटील यांच्यामार्फत राबविण्यात येणार असून सर्व गोविंदा पथक व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहनही कृष्णा पाटील यांनी केले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ४ सप्टेंबर २०२३
पान : ५
www.diwanews.com

**पॅराग्लाईडर्स, पॅरा मोटर्स, मायक्रोलाईट, एअर क्राफ्ट, ड्रोनच्या वापरावर १६ सप्टेंबरपर्यंत बंदी**

**मुंबई :** राष्ट्रीय हिताला बाधा पोहचविणाऱ्या तसेच राष्ट्रद्रोही कारवायांसाठी कारणीभूत ठरतील असे घटक जसे पॅराग्लाईडर्स, रिमोट कंट्रोल्ड मायक्रोलाईट एअरक्राफ्ट, ड्रोन, पॅरा मोटर्स, हँण्ड ग्लायडर्स, हॉट एअर बलूनच्या उड्डाणक्रियांना बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १६ सप्टेंबर २०२३ पर्यंत बंदी असल्याची माहिती पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर यांनी परिपत्रकाद्वारे दिली. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होऊ नये याकरीता हे बंदीचे आदेश लागू आहेत.

# यंदा टेंभीनाक्यावर अनुभवयाला मिळणार जल्लोष आणि थरांचा थरार...



## मानाची समजली जाणाऱ्या हंडीसाठी मुंबई व ठाण्यातील गोविंदा पथकांसाठी प्रत्येकी २ लाख ५१ हजार रुपयांचे पारितोषिक

***ठाणे : धर्मवीर आनंद दिघे यांनी ठाण्यात टेंभीनाका येथे दहिहंडी उत्सव सुरु करुन साहसी उत्सवाला एका उंचीवर नेऊन ठेवले. तोच उत्साह, तीच तरुणाईची धुम, थरांचा थरार आणि गोविंदा रे गोपाळाचा जयघोष, मान्यवरांची मांदियाळी, गीत संगीतासह भगव्याचा जल्लोष यंदा गुरूवार ७ सप्टेंबर २०२३ रोजी टेंभीनाक्यावर पहायला मिळणार असून हा दिमाखदार सोहळा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा होणार आहे.***


मुंबईचा जल्लोष आणि उत्साह ठाण्यात आणण्यासाठी धर्मवीर आनंद दिघे यांनी टेंभीनाक्यावरची हंडी मोठ्या जल्लोषात साजरी करण्याचा चंग बांधला. दिघेसाहेबानंतर विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही परंपरा कायम ठेवत या महोत्सवाला वेगळे वलय निर्माण करुन दिले. यंदा पुन्हा एकदा त्याच दिमाखात यंदा अनुभवायला मिळणार आहे. टेंभीनाक्यावरच्या हंडीत बक्षीसांबरोबरच त्याच दिवशी जाहीर केलेली बक्षीसे रोख स्वरुपात देण्यात येतात. खास मराठमोळा साज दिमाखदार सोहळा व आकर्षक बक्षीसे यामुळे ठाण्यातील ही परंपरा असलेली हंडी ठाण्याची मानाची हंडी म्हणून ओळखली जात आहे.

हा दिमाखदार सोहळा साजरा करताना ठाणे व मुंबईतील गोविंदा पथकांकरीता प्रत्येकी रोख बक्षीस व आकर्षक चषक देण्यात येणार आहे. या हंडीसाठी जाहीर करण्यात आलेले बक्षीस हे मानवीशक्ती असलेल्या थराकरीता आहे. दहीहंडी हा पारंपारिक उत्सव असून साहसी खेळही आहे. या खेळाच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यावेळी नमूद केले.

या दहीहंडी महोत्सवात मुंबई व ठाण्यातील गोविंदासाठी वेगवेगळी हंडी लावण्यात येणार आहे. मुंबईतील गोविंदा पथकासाठी व ठाण्यातील गोविंदा पथकासाठी प्रत्येकी २ लाख ५१ हजार रुपयांचे पारितोषिक, सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. महिला गोविंदा पथकासाठी १,००,०००/- रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले आहे. तर सात थर लावणाऱ्या गोविंदा पथकांसाठी १२,००० हजार, सहा थरांसाठी ८,००० हजार, पाच थरांसाठी ६००० हजार तर चार थर लावणाऱ्या गोविंदा पथकांसाठी ५००० हजार रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले आहे. दहीहंडी फोडणा-या गोविंदांच्या सुरक्षेसाठी रॅपलिंगसाठी असणारे दोरखंड वापरण्यात येणार असल्याचे शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांनी नमूद केले.

या दहीहंडी उत्सवात नामवंत गायक तसेच चित्रपटसृष्टीतील नामवंत कलाकारांचा नृत्य व संगीतमय जल्लोष असणार आहे. तसेच सुप्रसिध्द मराठी व हिंदी चित्रपट व मालिकांमधील प्रसिद्ध नायक/नायिका उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्राच्या लोककलेचा नृत्याविष्कार सुप्रसिध्द लावणी सम्राज्ञी आपल्या आकर्षक नृत्याने प्रेक्षकांचे मनोरंजन तसेच या उत्सवात आपल्या सुमधूर व जल्लोषमय गाण्यांनी येणाऱ्या गोविंदांना बेधुंद करणार आहेत. त्याचबरोबर उत्तम असा साउंड तसेच नेत्रदिपक रोषणाई या कार्यक्रमाची शोभा वाढविणार आहे. तसेच टेंभीनाक्यावर येणाऱ्या गोविंदा पथकांसाठी दुपारच्या जेवणाची सोय करण्यात येणार आहे.

हा दहीहंडी महोत्सव यशस्वी करण्याकरिता खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, उपजिल्हाप्रमुख रमेश वैती, ठाणे शहर संघटक अशोक वैती, शिवसेना ठाणे शहर विधानसभा प्रमुख हेमंत पवार, टेंभीनाका मित्रमंडळाचे माजी नगरसेवक सुधीर कोकाटे विभाग प्रमुख कमलेश चव्हाण आदी विशेष प्रयत्न करीत असल्याचे शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांनी नमूद केले.



## कोपरीत ४ मीटर बॉक्स जळून खाक

**ठाणे:** कोपरी, अष्टविनायक चौक येथील तळ अधिक ३ मजली असलेल्या शुभ मंगल सोसायटी या इमारतीच्या तळ मजल्यावरील महावितरण मीटर बॉक्स रुमला आग लागल्याची घटना गुरुवारी सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास समोर आली. ही आग २० मिनिटात नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले असून या आगीत ४ मीटर बॉक्स जळून खाक झाले आहेत.

# डेंग्यू मलेरियासदृश्य आजारांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी आरोग्य व फायलेरिया विभागाने समन्वयाने काम करावे-आयुक्त बांगर



**ठाणे : ऑगस्ट आणि सप्टेंबर या कालावधीमध्ये पावसाचे प्रमाण कमी होते, त्यामुळे जागोजागी पाणी साचल्यामुळे अशा ठिकाणांमधून डासांची व्युत्पत्ती होवू शकते व या कालावधीमध्ये डेंग्यू व मलेरियाचे प्रमाण वाढू शकते. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या माध्यमातून ज्या उपाययोजना करणे गरजेचे आहे याबाबत आयुक्त अभिजीत बांगर यांनी बुधवारी बैठक घेतली. डेंग्यू व मलेरियासदृश्य इतर आजारांची परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही याबाबत सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सतर्क राहणे गरजेचे असून प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याकरिता वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना फायलेरिया विभागाचे मनुष्यबळ पुरविण्यात यावे व दोघांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही आयुक्तांनी यावेळी संबंधित विभागांना दिले.**

यावेळी बाळकूम, मानपाडा, आयुर्वेदिक हेल्थ सेंटर, सीआर वाडिया, काजूवाडी, नौपाडा या आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी आयुक्तांनी संवाद साधला. जे रुग्ण डेंग्यूबाधित आहेत अशा सर्व रुग्णांनी उपचार घेतले आहेत की नाही व उपचारानंतर त्यांची सद्यस्थिती काय आहे, याबाबतचा दैनंदिन वस्तुनिष्ठ अहवाल सर्व वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांकडे उपलब्ध असणे गरजेचे आहे. कारण एखाद्या रुग्णास उपचारासाठी उशीर झाला असेल तर त्याचे प्लेटलेटस कमी होण्याची दाट शक्यता असते.त्यामुळे अशा रुग्णास आपल्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्याचा सल्ला दिला जावा तसेच एखादा व्यक्ती खाजगी रुग्णालयात उपचार घेवू इच्छित असेल तर त्याबाबतची मुभा द्यावी मात्र त्यांच्या आरोग्य स्थितीबाबत दैनंदिन पाठपुरावा करत रहावा असेही आयुक्तांनी नमूद केले. डेंग्यू व मलेरियाच्या रुग्णांना वेळेवर उपचारार्थ दाखल करुन घेण्यासाठी पुरेशा बेडची उपलब्धता असावी, कोणत्याही प्रकारे औषधाची कमतरता भासणार नाही, याबाबत संपूर्ण नियोजन करण्याचे आदेश या पूर्वीच वैदयकीय अधीक्षक व अधिष्ठाता यांना दिले असल्याचेही आयुक्तांनी यावेळी नमूद केले.

### आरोग्य विभाग व फायलेरिया विभागाने समन्वयाने काम करावे

प्रत्येक नागरी आरोग्य केंद्र निहाय रुग्णांची माहिती संकलित करुन ज्या ठिकाणी रुग्ण आढळला आहे तो राहत असलेल्या ठिकाणाची पाहणी करावी. फायलेरिया विभागातील कर्मचारी आरोग्य केंद्रातंर्गत वैद्यकीय अधिकारी यांना रिपोर्ट करतील व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली काम करतील अशा सूचना आयुक्त श्री. बांगर यांनी वेळी दिल्या. फायलेरिया विभागातील कर्मचाऱ्यांनी त्या- त्या विभागातील डासाची व्युत्पत्ती स्थाने शोधून तेथे आवश्यक ती औषध व धूर फवारणी तातडीने करावी. ज्या -ज्या ठिकाणी बाधित रुग्ण आहेत त्या विभागात अधिक दक्षतेने काम करणे गरजेचे आहे. यामध्ये इमारत परिसर वा झोपडपट्टी विभाग असेल याबाबत ज्या मार्गदर्शक सूचना आहेत त्यानुसार काम करुन तेथे प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन याची दैनंदिन माहिती संकलित करण्याची जबाबदारी प्रत्येक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची असेल असेही आयुक्तांनी नमूद केले. तसेच एखाद्या कर्मचाऱ्यांवर नेमून दिलेली जबाबदारी पार पाडण्यास टाळाटाळ करत असेल तर त्याबाबतची माहिती मुख्यालयास कळविण्यात यावी.

### खाजगी लॅबने महापालिकेस अहवाल सादर करावा

बहुतांश व्यक्ती या खाजगी लॅबमध्ये चाचण्या करुन घेतात. एखाद्या लॅबमध्ये डेंग्यू व मलेरिया सदृश्य रुग्ण आढळून आल्यास त्याबाबतची माहिती महापालिकेच्या आरोग्य केंद्रास कळविली जात नसल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत त्या त्या विभागातील वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी शहरातील सर्व खाजगी लॅबना पत्र देवून त्यांच्याकडे डेंग्यू, मलेरिया सदृश्य आजाराचा रुग्ण पॉझिटिव्ह आल्यास त्वरीत त्याची माहिती स्थानिक वैद्यकीय अधिकारी व मुख्यालय आरोग्य अधिकारी यांना कळविली जाईल हे पहावे. तसेच कुठल्याही परिस्थितीत २४ तासाच्या आत अहवाल प्राप्त झाला पाहिजे व तो संबंधित रुग्णास उपलब्ध करुन दिला जाईल याची दक्षता घ्यावी.

आरोग्य केंद्राच्या माध्यमातून रुग्णांची तपासणी केली जाते परंतु त्यांच्याकडे संकलित करण्यात येणाऱ्या रक्ताच्या नमुन्याची संख्या जास्त असल्यामुळे वेळेत अहवाल प्राप्त होत नाही, तरी आरोग्य केंद्राने त्यांच्याकडील रक्ताचे नमुने वाडिया येथील सेंट्रल लॅबकडे पाठवावेत. सेंट्रल लॅबच्या माध्यमातून २४ तासाच्या आत अहवाल देणे अपेक्षित असून याबाबतच्या सूचना संबंधितांना देण्यात याव्यात असेही आयुक्तांनी नमूद केले.तसेच चाचण्यांचा अहवाल हा आरोग्य केंद्र तसेच संबंधित रुग्णाला पाठविला जाईल याबाबतही नियोजन करावे.

लेप्टोस्पायरीसचा रुग्ण ज्या विभागात आढळून येईल त्या विभागातील जनावरांचे गोठे, तबेले आदी ठिकाणांचा सर्व्हे फायलेरिया व घनकचरा विभागाच्या माध्यमातून करण्यात यावा. बहुतांश ठिकाणी स्वच्छतेची काळजी घेतली जात नाही. जनावरांची विष्ठा साठवून ठेवली जाते किंवा नाल्यात टाकली जाते, संबंधित याबाबत योग्य ती काळजी घेत नसल्यास किंवा सदरचा कचरा उघड्यावर टाकत असल्यास त्यांना दंड आकारण्याच्या सूचना सर्व प्रभागातील स्वच्छता निरीक्षकांना देण्यात यावा. तसेच ज्या ठिकाणी गोठे, तबेले आहेत त्या ठिकाणची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कळवावी तसेच घनकचरा विभागाची गाडी पाठवून सदरचा कचरा उचलण्यात यावा. तसेच ड्रेनेज तसेच नाला या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी याबाबत विशेष दक्षता घ्यावी असेही आयुक्तांनी नमूद केले.

### बांधकामाच्या ठिकाणी फवारणी करावी

महापालिका कार्यक्षेत्रात ज्या- ज्या ठिकाणी बांधकामे सुरू आहेत, त्या ठिकाणी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे स्लॅबसाठी वापरण्यात येणारे पाणी बरेच दिवस राहत असल्यामुळे या ठिकाणी डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. अशा ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन संबंधितांकडून आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे की नाही याची माहिती घेवून त्या ठिकाणी फायलेरिया विभागाच्या माध्यमातून आवश्यक उपाययोजना व प्रतिबंधात्मक औषध व धूरफवारणी करणेबाबत सूचना देण्यात याव्यात असेही आयुक्तांनी नमूद केले.

### सोसायट्यांमध्येही फवारणी व्हावी

झोपडपट्टी भागामध्ये छतावर ठेवण्यात आलेल्या वस्तू, टायर यामध्ये पाणी साचून डासांची व्युत्पत्ती झाल्याचे आढळून येते. त्याच पध्दतीने झोपडपट्टी किंवा सोसायट्यांमध्ये घराच्या आत शोभेच्या झाडांच्या कुंड्या, फेंगशुई, छोटे कारंजे या मध्ये साचवलेल्या पाण्यामध्ये डासांची व्युत्पत्ती झाल्याचे मोठ्या प्रमाणावर आढळून आले आहे. तरी नागरिकांनी अशा ठिकाणी पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. जर घरामध्ये बेजबाबदारपणे पाणी साचवल्यामुळे डासाची व्युत्पत्ती झाल्याचे आढळले तर अशा कुटुंबास महापालिकेमार्फत दंडही केला जावू शकतो याची नागरिकांना जाणीव करुन द्यावी असे निदेश दिले. काही सोसायट्यांमध्ये सर्वे क्षणसाठी आलेल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना प्रवेश दिला जात नाही तरी वैध ओळखपत्राच्या आधारे सर्व सोसायट्यांमध्ये महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना प्रवेश मिळेल यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

### आपला दवाखानामध्ये नमुने संकलित करावे

आपला दवाखान्याच्या माध्यमातून देखील तपासण्यासाठी रक्ताचे नमुने संकलित करण्याची व्यवस्था करावी व संकलित नमुने वाडिया दवाखाना येथील सेंट्रल लॅब मध्ये पाठविण्यात यावे असेही आयुक्तांनी या बैठकीत सांगितले.

डेंग्यू व मलेरिया सदृश्य इतर आजारांच्या रुग्णांची संख्या वाढणार नाही व बाधित रुग्णांवर योग्य वेळेत उपचार होतील या दृष्टीकोनातून सर्वांनी समन्वयानी काम करावयाचे आहे. तसेच नागरिकांनी देखील महापालिकेने वेळोवेळी केलेल्या सूचनांचे पालन करावे. त्याचप्रमाणे आवश्यकता भासल्यास थेट माझ्याशी संपर्क साधावा असेही आवाहन आयुक्त अभिजीत बांगर यांनी यावेळी केले.

सदर बैठकीस उपायुक्त उमेश बिरारी, तुषार पवार, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. राणी शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ.चेतना के उपस्थित होते तसेच महापालिकेच्या सर्व आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी आभासी माध्यमातून उपस्थित होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ४ सप्टेंबर २०२३

www.diwanews.com

## कारला आग

**ठाणे:** गॅरेज मध्ये दुरूस्तीचे काम करण्यासाठी आलेल्या होंडा ॲकोर्ड कारने अचानक गुरुवारी सायंकाळी पावणे सहा वाजण्याच्या सुमारास पेट घेतल्याने आग लागली. ही घटना घोडबंदर रोड, हिरानंदानी इस्टेट येथे घडली असून ती आग साधारणपणे अर्ध्या तासात नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. तसेच ती कार जुभेन गांधी यांच्या मालकीची आहे. घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली होती. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.




# एकीकडे होणारा विकास आणि दुसरीकडे त्रासलेला सामान्य माणूस...

# दिव्यात हे असं कसं चालेल!

दिवा न्यूज सडेतोड / सुहास खंडागळे

**पावसाळा आला की दिव्यातील नाले येथील नेत्यांनी,समाजसेवकांनी जेसीबी लावून साफ करायचे.... गटारे तुंबली तर ती जनतेने साफ करायची...रस्त्यावर फेरीवाले बसले...लोकांना चालायला जागा उपलब्ध नसली की फेरीवाल्यांना दिवा मनसेने हटवायचे आणि रस्ते मोकळे करायचे?...हे सगळं जर दिव्यातील जनतेनेच करायचे आहे तर आयुक्त साहेब तुमच्या पालिकेचे पगारी अधिकारी आणि कर्मचारी करतात काय?हा आमचा प्रश्न आहे.**

सर्वसामान्य दिवेकरांचा रविवार हा पाण्यात जातो...तसा रविवार हा सार्वजनिक सुट्टीचा वार असला तरी दिव्यासाठी तो सार्वजनिक पाणी लाईन दुरुस्ती दिवस आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

येथील नागरिक स्वतःच्या इमारतीला होणाऱ्या पाणीपुरवठा लाईन स्वतः चेक करतात.दूरवरून पाणी लाईन आणल्या असतील तर त्या स्वतः चेक करण्यासाठी सुट्टीचा वार खर्च करतात....ठाण्याप्रमाणे दिव्यातील जनता देखील पालिकेचे सुविधा कर भरते...या भरलेल्या कराच्या बदल्यात कोणत्या सुविधा उपलब्ध होतात?

पूर्वी दिव्यात पक्के रस्ते नव्हेत. कच्चे रस्ते होते.तेव्हाचे कच्चे रस्ते किमान मोकळे होते.लोकांना चिखलातून चालावं लागत होतं मात्र चालायला मिळत होत. गाड्या चिखलात उभ्या राहत होत्या मात्र संध्याकाळच्या वेळेला पार्किंग मिळत होत...आता पक्के रस्ते झाले... गल्लीबोळात सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते झाले आणि लोकांना त्या रस्त्यावरून चालणे अवघड झाले. संध्याकाळी अख्या दिवा शहराचा जणू बाजार भरलेला असतो...अशा वेळी प्रश्न पडतो...हा रस्ते विकास नेमका कुणासाठी झाला?

आयुक्त साहेब,दिव्याकडे आताच लक्ष द्या...अन्यथा हे शहर बकाल होईल.नंतर उपाययोजना करणे अवघड जाईल.

ठाण्यासाठी विकासाची वेगळी मोजमापे आणि दिव्याला वेगळा न्याय असं करून चालणार नाही.फार मोठी लोकसंख्या दिव्यात वास्तव्यास आहे.या वाढलेल्या लोकसंख्येला सुविधा देणे हे पालक संस्था म्हणून महापालिकेचे काम आहे. कर्तव्य आहे!

जे अधिकारी, कर्मचारी हे कर्तव्य पार पाडण्यात अपयशी ठरत आहेत असे लोकं पालिकेचे प्रमुख म्हणून आपण परत बोलवायला हवेत. आयुक्त म्हणून आपण दिव्यात नागरी सुविधा उपलब्ध होत आहेत की नाही याकडे लक्ष द्यायला हवे... स्मार्ट होऊ पाहणाऱ्या ठाणे शहारा प्रमाणे दिव्यातील जनतेला सुद्धा त्याच विकासाची अपेक्षा आहे...आपण त्याकडे गांभीर्याने पाहणार का हा प्रश्न आहे.




मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसलेल्या नागरिकांवर लाठीचार्ज झाल्याच्या निषेधार्थ दिवा शहरात सकल मराठा समाजाच्या वतीने सदर घटनेचा निषेध करण्यात आला. जालना येथे मराठा आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांवर झालेल्या पोलीस लाठीचाराचा निषेध करण्यासाठी दिवा शहरातील सकल मराठा समाजाच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले.यावेळी जालना येथील घटनेचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी अशी मागणी यावेळी मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी केली. यावेळी प्रकाश पाटील, प्रवीण उत्तेकर, रमेश शिंदे, आदित्य कदम, नामदेव पाटील, संभाजी जाधव, नारायण पाटील, कृशिरज चव्हाण, कल्पेश शेलार, संजय पाटील, दिनेश चासकर, राहुल खैर, भरत शिंत्रे, हितेश मोरे, विशाल रावताळे, रवींद्र पाटील, मराठा उद्योजक टीम अडमिन टीम पालघर - दिवा, अशोक पाटील आदी उपस्थित होते.



# गोवर्धन भगत यांच्या जीवन चरित्रावरील 'अष्टपैलू दादा' पुस्तकाचे प्रकाशन ६ सप्टेंबरला!

**दिवा:**-दिव्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी स्थायी समिती सभापती गोवर्धन भगत यांच्या जीवनचरित्रावर आधारित अष्टपैलू दादा या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा बुधवारी सहा सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला ज्येष्ठ विचारवंत, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉक्टर श्रीपाल सबनीस हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत.सदर पुस्तक प्रकाशन सोहळा गडकरी रंगायतन येथे ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत पार पडणार असून या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर प्रकाशन सोहळ्यासाठी दिवा येथून नागरिकांना जाण्यासाठी दिवा हायस्कूल येथून बसेसची सुविधा उपलब्ध करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ४ सप्टेंबर २०२३ पान : ८
www.diwanews.com



### नौपाड्यात धोकादायक इमारतीचा काही भाग पडून एक जण जखमी

**ठाणे:** नौपाड्यातील कलावती भुवन या ( सी + १ कॅटेगरीमधील) धोकादायक इमारतीचे बांधकाम जागा मालक यांच्या मार्फत तोडत असताना त्या इमारतीचा काही भाग ओम साई प्रसाद या इमारतीच्या आवारात पडल्याची घटना शुक्रवारी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत त्यावेळी तेथून जाताना तरुण पाबले (२८) हे जखमी झाले आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.


# पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा – आयुक्त अभिजीत बांगर



## समस्या उद्भवल्यास महापालिकेच्या हेल्पलाईनवर संपर्क साधावा

**ठाणे:** काही दिवसांवर दहीहंडी, गणेशोत्सव असल्यामुळे सर्व उत्सव निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी महानगरपालिका, पोलीस यंत्रणा, वाहतूक विभाग तसेच एमएसईबी आदी सर्व यंत्रणांच्या समन्वयाने नियमांचे पालन करुन सण- उत्सव साजरे होतील या दृष्टीने कार्यवाही करावी. उत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची सर्वतोपरी दक्षता सर्व यंत्रणांनी घ्यावी तसेच सार्वजनिक मंडळांनी देखील उच्च न्यायालयाच्या आदेशाचे व महापालिकेच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे निर्देश मंगळवारी झालेल्या बैठकीत महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले.

सार्वजनिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व गणेश मंडळांची बैठक आज महापालिकेतील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित करण्यात आली होती. महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व उत्सव यशस्वीरित्या पार पाडता यावेत यासाठी महापालिकेच्यावतीने नियमावली तयार करण्यात आलेली आहे. तसेच गणेश मंडळांना मंडप परवानगीसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करण्यात आली असून, तात्पुरत्या स्वरुपात नोंदणी करणाऱ्या मंडळांना देखील ऑनलाईन अर्ज करता येतील तशी कार्यप्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे, तरी सर्व मंडळांनी ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज सादर करावेत असेही आयुक्त बांगर यांनी नमूद केले. तसेच मंडळाचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त दोन दिवसात परवानगी दिली जाईल या दृष्टीने कार्यवाही करावी. सदर ऑनलाईन प्रणाली एक खिडकी योजनेप्रमाणेच कार्यरत असल्यामुळे मंडळांना परवानगीसाठी आवश्यक पोलीस विभाग, वाहतूक विभाग व अग्निशमन विभाग यांच्या ना-हरकत दाखल्यांसाठी विभागांकडे पाठपुरावा करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. सदर विभागांनी ऑनलाईन पध्दतीनेच ना-हरकत दाखले उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्यानंतर गणेशमंडळास ऑनलाईन पध्दतीने अंतिम परवानगी विहित कालमर्यादेत उपलब्ध करुन दिली जाईल.




## अवकाश संशोधन क्षेत्रात महासत्ता बनण्याच्या दिशेने भारताची वाटचाल सुरू – उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई** -चंद्रयान-३ च्या यशस्वी स्वारीनंतर सौर मोहिमेतील आदित्य एल-१ हे भारताचे पहिले सूर्ययान आज सूर्याच्या दिशेने यशस्वीपणे झेपावले. यशस्वी चंद्र मोहिमेनंतर अवकाश संशोधन क्षेत्रातील जागतिक सत्ता बनलेल्या भारतानं अवकाश महासत्ता बनण्याच्या दिशेनं वाटचाल सुरु केली आहे, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काढले आहेत.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, चंद्रयान आणि आता सूर्ययानाच्या माध्यमातून भारतीय अवकाश संशोधन संस्थेने आपल्या देशाला अवकाश संशोधन क्षेत्रात जागतिक ओळख, वलय, विश्वास मिळवून दिला आहे. यापुढे देखील अनेक अवकाश मोहिमा राबवून देशाच्या, जगाच्या संशोधन क्षेत्राच्या विकासात मोठी भर घालण्यात आपण यशस्वी होऊ. भारताच्या या गौरवशाली वाटचालीत योगदान देणाऱ्या सर्व आजी-माजी वैज्ञानिक, तंत्रज्ञ, अभियंता, अधिकारी-कर्मचारी आणि समस्त भारतीयांचे उपमुख्यमंत्री पवार यांनी अभिनंदन केले आहे.

## ठाण्यातील आदिवासी पाडे सोलर दिव्यांनी उजळणार

### पुढील महिन्यात कामाला सुरुवात होणार

**ठाणे :** ठाणे महापालिका हद्दीमधील डोंगराळ भागामध्ये, आदिवासी पाड्यांकरीता सोलर दिवे बसविण्यासाठी राज्य सरकारने मंजुरी देत, या कामासाठी ५ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. त्यामुळे आदिवासी पाड्यांत लागणार सोलर दिव्यांचा फायदा आदिवासी वस्तीला होणार आहे. तसेच या कामाची निविदा प्रक्रिया झाल्यामुळे हे सोलर दिवे लावण्याचे काम पुढील महिन्यात सुरु होईल, अशी माहिती आमदार सरनाईक यांनी दिली.

ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघात ठाणे, मीरा भाईंदर महापालिका हद्दीत जवळपास २७ छोटे-मोठे आदिवासी पाडे आहेत. या आदिवासी पाड्यात सौर पथदिवे या प्रणालीमध्ये वापरली जाणारी बॅटरीत साधारण १० ते ११ तास पुरेल इतकी उर्जा साठवून ठेवण्यास सक्षम आहे. शिवाय यामध्ये दिवे चालू व बंद करण्यासाठी एक स्वयंचलित बटन देखील असणार आहे. जे सायंकाळ ते पहाट या कालावधीत दिवे वापरण्यासाठी बनविलेले असते तसेच बॅटरीला अतिरिक्त चार्ज होण्यापासून तसेच ती अतिरिक्त ड्रेन होण्यापासून म्हणजे तिची ताकद पूर्णपणे संपण्यापासून रोखता ही येणार आहे.

### ५ कोटींचा निधी मंजूर

सूर्यापासून मोफत मिळणाऱ्या ऊर्जेचा वापर करून आपल्या रोजच्या जगण्यात सौर ऊर्जेचा वापर करण्याचा संकल्प केला तर नक्कीच त्याचा मोठा फायदा होईल. सौर ऊर्जेचे महत्व जाणून घेऊन तरुणांनी याबाबत समाजात जागृती करण्याची गरज आहे. सौर ऊर्जे चे महत्व, सौर उर्जेवर चालणारी उपकरणे, या उपकरणांची किंमत व ती वापरण्याची पद्धत याबाबत लोकांना अधिकाधिक माहिती देण्याची गरज असल्याचे आमदार सरनाईक यांनी म्हटले आहे.